# मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली
# शारदीय नवरात्र महोत्सव 2017
# पुर्व नियोजन/पुर्व तयारी बैठक

दि.15/09/2017 वेळ :- स.11.40 वाजता

ठिकाण:- सर्किट हाऊस तुळजापूर

पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय

उस्मानाबाद

# प्रस्तावना

श्री तुळजाभवानी देवीजींचा शारदीय नवरात्र महोत्सव दि 20/09/2017 ते 05/10/2017 या कालावधीत साजरा केला जात आहे. महोत्सव काळात तुळजापूर येथे मोठ्या प्रमाणात भावीक भक्त दाखल होतात पर्यायाने वाढत्या जनसंख्येस अनुसरुन पुरवठा विभागा मार्फत पुर्वतयारी करण्यात आली आहे. या मध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

1) महोत्सव काळात तुळजापूर तालुक्यातील रेशनकार्ड धारकांना करण्यात येणारा जीवनावश्यक वस्तु (गहु,तांदुळ) यांचा पुरवठा विहीत मुदतीत केला जावा या करिता करण्यात आलेल्या उपाय योजना.

2) पेट्रोल पंपावरील पेट्रोल व डिझेल याचा पुरेसा पुरवठा करणे बाबत करण्यात आलेल्या उपाय योजना.

3) घरगुती वापराचे व वाणिज्य वापराचे एल.पी.जी. गॅस वितरणा बाबत केलेल्या उपाय योजना

4) महोत्सव कालावधी मध्ये घरगुती वापराच्या निळ्या केरोसिनच्या पुरेशा पुरवठ्या बाबत केलेल्या उपाययोजना.

# उस्मानाबाद जिल्हा नकाशा



# तुळजापूर शहर नकाशा



1) महोत्सव काळात तुळजापूर तालुक्यातील रेशनकार्ड धारकांना करण्यात येणारा जीवनावश्यक वस्तु (गहु,तांदुळ) यांचा पुरवठा विहीत मुदतीत केला जावा या करिता करण्यात आलेल्या उपाययोजना.

# माहे सप्टेंबर 2017 साठी तुळजापूर तालुक्यास मंजूर करण्यात आलेले अन्नधान्य (गहु, तांदुळ) नियतन

(आकडे क्विंटलमध्ये)

| अ. क्र | गोदामाचे नाव | अंत्योदय | | प्राधान्य | | ए.पी.एल. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गहू | तांदुळ | गहू | तांदुळ | गहू | तांदुळ |
| 1 | तुळजापूर | 627.90 | 418.60 | 2520.87 | 1680.58 | 973.80 | 649.20 |
| 2 | नळदुर्ग | 447.93 | 298.62 | 1960.77 | 1307.18 | 789.51 | 526.34 |
| | एकूण | 1075.83 | 717.22 | 4481.64 | 2987.76 | 1763.31 | 1175.54 |

# माहे सप्टेंबर 2017 साठी तुळजापूर तालुक्यास मंजूर अन्नधान्य नियतनापैकी शासकीय धान्य गोदाम तुळजापूर अंतर्गत तुळजापूर शहरातील एकूण 15 स्व.धा.दुकान वाटपाचा तपशील दि.14/09/2017 अखेर

आकडे (क्विंटलमध्ये)

| योजना | धान्य नियतन | | उचल | | वाटप | | शिल्लक | | वाटप टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गहू | तांदुळ | गहू | तांदुळ | गहू | तांदुळ | गहू | तांदुळ | गहू | तांदुळ |
| अंत्योदय | 174.5 | 116.3 | 168 | 111.1 | 168 | 111.1 | 6.51 | 5.28 | 96% | 96% |
| प्राधान्य कुटंब | 232.7 | 154.6 | 227.1 | 151.5 | 227.1 | 151.5 | 5.55 | 3.07 | 98% | 98% |
| शेतकरी | 146.3 | 97.5 | 127 | 85.02 | 127 | 85.02 | 19.23 | 12.48 | 87% | 87% |
| एकूण | 553.5 | 368.4 | 522.2 | 347.6 | 522.2 | 347.6 | 31.29 | 20.83 | 94% | 94% |

2) पेट्रोल पंपावरील पेट्रोल व डिझेल

याचा पुरेसा पुरवठा करणे बाबत करण्यात आलेल्या उपाय

योजना.

# तुळजापूर शहरातील पेट्रोलपंप



# तुळजापूर शहरातील पेट्रोलपंप बाबतची माहिती

| अ.क्र. | तालुका | पेट्रोल पंपाचे नाव | कंपनीचे नाव | क्षमता (के.एल.) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | पेट्रोल | डिझेल |
| 1 | तुळजापूर | शुभम हायवे सर्विसेस, तुळजापूर | भारत पेट्रोलीयम | 10 | 40 |
| 2 | | श्री भवानी शंकर पेट्रोल पंप, तुळजापूर | हिंदुस्तान पेट्रोलियम | 9 | 22 |
| 3 | | बाबा पेट्रोल पंप, तुळजापूर | एस्सआर | 20 | 40 |
| 4 | | जयेश पेट्रोलियम तुळजापूर | हिंदुस्तान पेट्रोलियम | 16 | 22 |
| 5 | | सुर्यकांत ॲन्ड क. तुळजापूर | भारत पेट्रोलीयम | 18 | 20 |
| | एकूण | | | 73 | 144 |

# तुळजापूर तालुक्यातील पेट्रोल पंप बाबतची माहिती

| अ.क्र | तालुक्याचे नाव | पेट्रोल पंपाचे नाव | कंपनीचे नाव | क्षमता (के.एल) | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळजापुर | | | पेट्रोल | डिझेल |
| 1 | | लोकमंगल पेट्रोलीयम, देवसिंगा | भारत पेट्रोलीयम | 15 | 20 |
| 2 | | सुशिलकुमार पेट्रोलीयम, जळकोट | भारत पेट्रोलीयम | 15 | 20 |
| 3 | | रुपा पेट्रोलीयम,, कसई | हिंदुस्तान पेट्रोलियम | 16 | 22 |
| 4 | | वेंकटेश पेट्रोलीयम, तिर्थ बु. | भारत पेट्रोलीयम | 15 | 20 |
| 5 | | मधुशाली नळदुर्ग हायवे सर्विस, नळदुर्ग | इंडियन ऑईल | 20 | 20 |
| 6 | | शुभम हायवे सर्विसेस, तुळजापुर | भारत पेट्रोलीयम | 10 | 40 |
| 7 | | लक्ष्मी पेट्रोलियम, सिंदफळ | भारत पेट्रोलीयम | 9 | 20 |
| 8 | | वैष्णवीदेवी पेट्रोलियम, सिंदफळ | इंडियन ऑईल | 20 | 40 |
| 9 | | अंजली पेट्रोलियम, बोरी | भारत पेट्रोलीयम | 15 | 15 |
| 10 | | श्री भवानी शंकर पेट्रोल पंप, तुळजापुर | हिंदुस्तान पेट्रोलियम | 9 | 22 |
| 11 | | धनलक्ष्मी हायवे सर्विसेस, तिर्थ बु. | इंडियन ऑईल | 20 | 20 |
| 12 | | बाबा पेट्रोल पंप, तुळजापुर | एस्सआर | 20 | 40 |
| 13 | | जयेश पेट्रोलियम तुळजापुर | हिंदुस्तान पेट्रोलियम | 16 | 22 |
| 14 | | सुर्यकांत ॲन्ड कं. तुळजापुर | भारत पेट्रोलीयम | 18 | 20 |
| 15 | | शंभू महादेव पेट्रोलियम काटी | भारत पेट्रोलीयम | 9 | 20 |
| 16 | | मोरेश्वर पेट्रोलियम सांगवी मार्डी | हिंदुस्तान पेट्रोलियम | 9 | 20 |
| 17 | | इंडियन ऑईल जळकोट | इंडियन ऑईल | 15 | 20 |
| | | एकुण | | 251 | 401 |

महोत्सव / यात्रा कालावधीत तुळजापूर शहर व परिसरात पेट्रोल व डिझेलच्या पुरवठया बाबत नियोजना करिता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पेट्रोल पंप चालकांची
दि 23/08/2017 रोजी तहसील कार्यालय तुळजापूर येथील बैठक



बैठकीमध्ये सर्व पेट्रोल पंप धारक यांना महोत्सव / यात्रा कालावधीमध्ये पेट्रोल व डिझेलचे नियमीत वितरण करणे बाबत सुचना दिल्या तसेच पेट्रोल व डिझेल साठ्याचे एक दिवसाआड नमुने घेवून घेतलेले नमुने तपासणी करीता पाठविण्या बाबत तहसिलदार तुळजापूर यांना सुचना देण्यात आली आहे. सदर तपासणीत भेसळयुक्त पेट्रोल किंवा डिझेल आढळल्यास संबधीत पंप चालकांविरुध्द कायदेशीर कार्यवाही केली जाईल याबाबत सक्त सुचना दिली. जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून पेट्रोल, डिझेलचा गैरवापर, साठेबाजी, काळाबाजार, कृत्रिम तुटवडा, भेसळ करत असल्यास त्याची तपासणी करणेसाठी 6 पथके नियुक्त करण्यात आली असून सदरील पथकामध्ये 1 नायब तहसिलदार, 1 अ.का., अन्न व सुरक्षा विभागाचे तज्ञ सहायक, वैध मापक विभागाचे तज्ञ सहायक यांचा समावेश आहे. सदरील पथके उपविभागीय अधिकारी उस्मानाबाद यांचे आदेशानुसार रोटेशन पद्धतीने एक दिवसाआड तपासणी करून जिल्हा पुरवठा कार्यालयास अहवाल सादर करतील. तसेच तहसिलदार तुळजापूर यांचे स्तरावर 2 तपासणी पथके व जिल्हा स्तरावर अचानक तपासणी करण्या करीता 1 पथक नियुक्त करण्यात आले असून रोटेशन पध्दतीने सदर पथकामार्फत तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

3) घरगुती वापराचे व वाणिज्य वापराचे एल.पी.जी. गॅस वितरणा बाबत केलेल्या उपाय योजना

# तुळजापूर तालुक्यातील गॅस एजन्सी बाबतची माहिती

| अ. क्र | तालुक्याचे नाव | गॅस एजन्सीचे नाव | कंपनीचे नाव | जोडणी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळजापूर | श्री गॅस एजन्सी, तुळजापूर | भारत पेट्रोलियम | 37247 | |
| | | वैशाली गॅस एजन्सी, नळदुर्ग | हिंदुस्तान पेट्रोलियम | 15148 | |
| | | जिजाई गॅस एजन्सी तामवाडी | भारत पेट्रोलियम | 5202 | |
| | | शंकरराव गॅस एजन्सी, जळकोट | भारत पेट्रोलियम | 8861 | |
| | | | एकूण | 66458 | |

- तुळजापूर तालुक्यामध्ये एकूण 66458गॅस जोडणी संख्या असून तुळजापूर शहरामध्ये श्री गॅस एजन्सी(भारत पेट्रोलियम) ही एकमेव गॅस एजन्सी कार्यरत आहे. एजन्सीकडे 37247 गॅस जोडण्या आहेत.
- दि.23/08/2017 रोजी संबंधित श्री गॅस एजन्सी यांचे प्रतिनिधींची तहसील कार्यालय तुळजापूर येथे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी बैठक घेतली असून महोत्सव कालावधीत कोणत्याही परिस्थितीत घरगुती तसेच वाणिज्य वापराकरिता गॅस सिलिंडर कमी पडू नये याकरिता खबरदारी घेणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच घरगुती वापराचे L.P.G. घरगुती गॅस धारकांपैकी ज्या गॅस धारकांनी सरासरीपेक्षा जास्त संख्येने सिलिंडरची मागणी नोंदविल्यास त्याचा प्रतिदिन अहवाल तहसीलदार तुळजापूर यांचेमार्फत जिल्हा प्रशासनास सादर करणेबाबत सूचना दिल्या आहेत.
- वाणिज्य वापराच्या L.P.G. गॅसचा संपूर्ण पुरवठा तात्काळ करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत तसेच वाणिज्य वापराच्या L.P.G. गॅसची महोत्सव/यात्रा कालावधीत मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन उर्वरित गॅस एजन्सीकडून आवश्यकता भासल्यास सिलिंडर उपलब्ध करून घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

1. घरगुती वापराच्या सिलिंडरचा व्यावसायिक वापर, साठेबाजी, काळाबाजार, कृत्रिम तुटवडा यास प्रतिबंध करणेकरिता जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालियाकडून एकूण 6 पथके नियुक्त करण्यात आली असून सदरील पथकात 1 नायब तहसिलदार, 1 अ.का. अन्न व सुरक्षा विभागाचे तज्ञ सहायक व वैध मापक शास्त्र विभागाचे तज्ञ सहायक यांचा समावेश आहे. सदरील पथके उपविभागीय अधिकारी उस्मानाबाद यांचे आदेशानुसार रोटेशन पद्धतीने एक दिवसाआड तपासणी करून जिल्हा पुरवठा कार्यालयास अहवाल सादर करतील. याचसोबत जिल्हा स्तरावर 1 पथक अचानक तपासणी करणेकरिता नियुक्त करण्यात आले आहे.

4) महोत्सव कालावधी मध्ये घरगुती वापराच्या निळ्या केरोसीनच्या पुरेशा पुरवठ्या बाबत केलेल्या उपाययोजना

# तुळजापूर तालुक्यातील केरोसीन दुकान बाबतची माहिती

| अ. क्र | तालुक्याचे नाव | घाऊक केरोसीन परवाना धारक | अर्ध घाऊक केरोसीन परवाना धारक | किरकोळ केरोसीन परवाना धारक | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळजापूर | 0 | 14 | 171 | 185 |
| | एकूण | 0 | 14 | 171 | 185 |

# तुळजापूर शहरातील रास्तभाव व किरकोळ केरोसीन व हॉकर्स परवानाधारक संख्या

| अ.क्र. | रास्तभाव दुकान संख्या | किरकोळ केरोसीन दुकान परवानाधारक | हॉकर्स परवानाधारक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 14 | 17 | 34 |

# माहे सप्टेंबर 2017 करिता तुळजापूर तालुक्यास मंजूर केरोसीन नियतनापैकी तुळजापूर शहरातील केरोसीन दुकानांना वाटप केलेल्या केरोसीन बाबतचा तपशील दि.14/09/2017 पर्यंत

| हॉकर्स परवाना धारक | किरकोळ परवानाधारक संख्या | केरोसीन नियतन | उचल | वाटप | शिल्लक | वाटप टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 34 | 17 | 10400 लीटर | 10400 लीटर | 10400 लीटर | 0 | 100 % |

- महोत्सव काळापूर्वी केरोसीन कार्डधारकांना पुरविण्यात येईल यासाठी वरीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या असून केरोसीनचा गैरवापर, साठेबाजी, काळाबाजार, कृत्रिम तुटवडा, भेसळ इ. रोखण्यासाठी व तपासणी करणेसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून 6 पथके नियुक्त करण्यात आली असून सदरील पथकामध्ये 1 नायब तहसिलदार, 1 अ.का. अन्न व सुरक्षा विभागाचे तज्ञ सहायक व वैध मापक शास्त्र विभागाचे तज्ञ सहायक यांचा समावेश आहे. सदरील पथके उपविभागीय अधिकारी उस्मानाबाद यांचे आदेशानुसार रोटेशन पद्धतीने एकदिवसाआड तपासणी करून जिल्हा पुरवठा कार्यालयास अहवाल सादर करतील. त्याचसोबत जिल्हा स्तरावर अचानक तपासणी करणेकरिता 1 पथक नियुक्त करण्यात आले आहे.



धन्यवाद...!!!